प्रकरण **2 रे**

प्रतिबंधक आणि रोग निवारक सेवा समाजातील सर्व लोकाना देणे हे रूग्णालयाचे मुख्य ध्येय आहे.

या रूग्णालयातील प्रचार कार्य समाजातील सर्व थरांतील लोकाना प्राथमिक आणि दुय्यम आरोग्य विषयक सेवा देणे हे होय !

उपलब्ध असलेल्या साधन संपत्ति आणि मनुष्यबळाचा जास्तीत जास्त लोकांच्या सेवेसाठी वापर व्हावा हाच या रूग्णालयाचा मुख्य उददेश आहे.

रूग्णालयात येणा-या प्रत्येक व्यक्तिला नेहमीची नमूद केलेली आणि अत्यंत निकडीची आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे हे रूग्णालयाचे मुख्य ध्येय आहे.

रूग्णालय या सोयी उपलब्ध करून देते

बाहयरूग्ण विभाग :- वैद्यकिय विभाग, शत्राक्रिया विभाग, लहान मुलांचा विभाग, अस्थिव्यंग, मानसोपचार, क्षकिरण विभाग, चाचणी केंद आणि हृदयसंपदन आलेख मार्गे रोगनिदान केले जाते तसेच रूग्णालय औषधालया अन्वये सहाय्यसेवा पुरविते.

रूग्णालयात अतिदक्षता विभाग नसला तरी व बाहयरूग्ण विभाग बंद झाल्यावर अत्यंत निकडीची सेवा 24 तास गंभीर, जखमी रूग्णाला व इतर रूग्णाला सुदधा उपलब्ध केली जाते.

सेवा उपलब्ध असलेले दिवस व वेळा

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | वैद्यकिय | सोमवार ते शनिवार | 8.00 ते 3.00 |
| 2 | शत्राक्रिया | मंगळवार, गुरूवार, शनिवार | 8.00 ते 3.00 |
| 3 | बाहय रूग्ण सेवा | सोमवार ते शनिवार | 8.00 ते 3.00 |
| 4 | अस्थिव्यंग | बुधवार व शनिवार | 8.00 ते 3.00 |
| 5 | मानसोपचार | सोमवार व शुक्रवार | 1.00 ते 3.00 |
| 6 | श्वानदश | सोमवार ते शनिवार | 8.00 ते 11.30 |
| 7 | लसिकरण | सोमवार, मंगळवार, गुरूवार, शुक्रवार, शनिवार | 8.00 ते 11.30 |

<u>आंतररूग्ण विभाग</u>
वैद्यकिय
शत्राक्रिया
बाल रूग्ण

रोग निदान

| अनु. क्र. | विभाग | दिवस | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | क्षकिरण चाचणी | सोमवार ते शनिवार | 8.00 ते 4.00 |
| 2 | चाचणी केंद | सोमवार ते शनिवार | 8.00 ते 4.00 |
| 3 | हृदयस्पंदन आलेख | सोमवार, बुधवार, शुक्रवार | 8.00 ते 4.00 |

जोडसेवा म्हणून सकाळी 8.00 ते 4.00 पर्यंत रूग्णवाहीका सेवा दिली जाते.

पुढील लसिकरण सेवा दिल्या जातात

1 लसिकरण सेवा ही जागतिक आरोग्य सेवेकडून उपलब्ध करून दिली जाते.

2 गरोदर त्रासाठी लसिकरण

3 जंतुसंसर्ग, ीवानदंश, कावीळ वर लसिकरण

स. का. पाटील रूग्णालयातील कर्मचा-यांची संख्या.

| अनु. | पद | संख्या |
|---|---|---|
| 1 | प्रमुख वैद्यकिय अधिकारी | 1 |
| 2 | वरिष्ठ वैद्यकिय अधिकारी | 1 |
| 3 | वैद्यकिय अधिकारी | 5 |
| 4 | मानसेवी सहाय्यक | 3 |
| 5 | वैद्यकिय कर्मचारी | 6 |
| 6 | परिसेविका | 3 |
| 7 | परिचारिका | 14 |
| 8 | कार्यालयीन कर्मचारी | 5 |
| 9 | श्रमिक | 24 |
| 10 | खाडा बदली | 5 |

मागील वर्षाचा कामाचा तपशील

| अनु. | सेवा | अहवाल |
|---|---|---|
| 1 | नवीन बाहयरूग्ण | 21905 |
| 2 | जुने बाहयरूग्ण | 40051 |
| 3 | आंतरूग्ण | 10229 |
| 4 | मोठया शत्राक्रिया | 7 |
| 5 | लहान शत्राक्रिया | 17 |
| 6 | लसिकरण | 20161 |
| 7 | ीवानदंश | 13772 |
| 8 | क्षकिरण | 2515 |
| 9 | हृदयस्पंदन आलेख | 622 |
| 10 | चाचणी केंद | 47322 |

रूग्णालयाचे कामकाज परिणामकारक होऊन कार्यक्षमता वाढण्यासाठी प्रत्येक रूग्णाची ही जबाबदारी आहे की त्यानी औषधोपचार योग्य पद्धतीने, सातत्याने आणि योग्य पाठपुराव्याने करणे जरूरीचे आहे, जर काही समस्या असेल तर संबधित वैद्यकिय अधिका-याला किंवा प्रमुख वैद्यकिय अधिका-याला भेटून त्याचे निवारण करावे.

रूग्णालयात कामाच्या पध्दतीचे आणि लोकांच्या गा-हाण्याचे निरिक्षण करण्याची सोय उपलब्ध आहे.  खाते प्रमुखाकडून कामाचे निरिक्षण केले जावून प्रमुख वैद्यकिय अधिका-याना तपशिल पाठविला जातो.  लोकांच्या गा-हाणाची दखल वरिष्ठाकडून घेतली जाते, जसे योग्य ती माहिती देणे, तक्रार नोंदवून घेणे, चौकशी करणे आणि त्यानुसार ती सोडविणे. वैद्यकिय अधिका-याकडून सर्व तक्रारीचे निवारण केले जाते आणि प्रमुख वैद्यकिय अधिका-याकडून या सर्व तक्रारी संबंधात उचित कारवाई केली जाते.